“औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चाकूर, जि. लातूर” या संस्थेसाठी भूसंपादित करण्यात आलेल्या जमिनीचा वाढीव मावेजा रू. २,१५,८२,०००/- इतकी रक्कम मा. उच्च न्यायालयात जमा करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन

कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

शासन निर्णय क्रमांक : अर्थसं-२४११/२०१७/प्र.क्र १६०/व्य.शि -२,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०६ मार्च, २०१८.

संदर्भ :- व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक १२/नियोजन (पुर.मा.)/ २०१७/प्र.क्र.८९, : दिनांक ०७ नोव्हेंबर, २०१७.

प्रस्तावना:-

औद्योगिक प्रशिक्षण संस्था चाकूर जि.लातूर या संस्थेसाठी उप विभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी उदगीर जिल्हा लातूर यांनी त्यांच्या दिनांक १४.०३.२००१ च्या भूसंपादन निवाडा आदेशानुसार मौजे चाकूर येथील गट क्र.२६३ व २६४ मधील १ हेक्टर ६६ आर जमिन संपादित केली होती. जमिन मालक श्री. अविनाश बाळासाहेब जाधव यांना या भुसंपादना पोटी रू. ४१,७६,१९३/- इतका मावेजा देण्यात आला होता. तथापि जमिन मालक श्री. अविनाश बाळासाहेब जाधव यांना सदर जमिनीच्या भुसंपादनापोटी मिळालेला मावेजा मान्य नसल्यामुळे त्यांनी वाढीव मावेजा मिळणेसाठी. मा.जिल्हा व सत्र न्यायालय लातूर येथे क्र.७३३/२००२ नुसार दावा दाखल केला होता. सदर दाव्याचा निकाल मा. जिल्हा सत्र न्यायालय लातूर यांनी दि. २६/०९/२०१४ रोजी खलील प्रमाणे दिलेला आहे.

“The Reference is hereby partly allowed with proportionate costs as under :-

The claimant is entitled to receive compensation of Rs.52.50 per sq. Feet along with 30% solatium,12% increase, on the enhanced compensation amount from the date of notification under section 4 of the Land Acquisition Act, i.e., 08/02/2001 till the date of declaration of award i.e., 11/07/2001, along with interest at the rate of Rs.9% per annum ,for the first year, from the date of notification under section 4 of the Land Acquisition Act, i.e., 08/02/2001 to 07/02/2002 and 15% per annum Interest for the subsequent years till realization of the amount.

Award be drawn accordingly.”

जिल्हा सत्र न्यायालय लातूर यांच्या सदर निर्णयाच्या विरूद्ध शासनाच्या वतीने मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे अपील क्र. १५५०८/२०१५ दाखल करण्यात आले होते. सदर अपिलामध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.३/६/२०१६ च्या आदेशान्वये रू ४.१५ कोटी इतक्या आवाहानित रक्कमेच्या ५०% रक्कम न्यायालयात जमा करण्याचे आदेश दिले.

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने संदर्भाधिन पत्रान्वये,"औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चाकूर, जि. लातूर" या संस्थेसाठी भूसंपादित करण्यात आलेल्या जमिनीचा वाढीव मावेजाची रू. २,१५,८२,०००/- इतकी रक्कम मा. उच्च न्यायालयात जमा करण्यासाठी "मागणी क्रमांक : झेडए-१, २२३०-कामगार व सेवायोजन, ०३ प्रशिक्षण, ००३ कारागिर व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण, (०२) कारागिरांचे तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण (०२) (०२) कारागिरांचे तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण भारीत (अनिवार्य) (२२३० ए०६७)" "१३ कार्यालयीन खर्च" या लेखाशिर्षाखाली डिसेंबर २०१७ च्या अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे मंजूर करून उपलब्ध करून देण्याची विनंती केली होती. त्यानुसार रू.२,१५,८२,०००/- इतकी रक्कम पुरवणी मागणीद्वारे मंजूर करणेचा प्रस्ताव डिसेंबर २०१७ च्या अधिवेशनात सादर करण्यात अला होता. सदर पुरवणी मागणीचा प्रस्ताव मंजूर झालेला आहे. त्यानुषंगाने रू. २,१५,८२,०००/- इतकी रक्कम मा. न्यायालयात जमा करण्यासाठी उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय :-</u>

शासन आता याद्वारे,औद्योगिक प्रशिक्षण संस्था,चाकूर, जि.लातूर या संस्थेसाठी भूसंपादित करण्यात आलेल्या जमिनीचा वाढीव मावेजाची रुपये २,१५,८२,०००/- (रुपये दोन कोटी पंधरा लाख ब्याऐंशी हजार फक्त) इतकी रक्कम मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे जमा करण्यास मान्यता देत आहे.

२. सदर रूपये २,१५,८२,०००/-इतक्या रक्कमेचा खर्च "मागणी क्रमांक : झेडए-१, २२३०-कामगार व सेवायोजन, ०३ प्रशिक्षण, ००३ कारागिर व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण, (०२) कारागिरांचे तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण (०२) (०२) कारागिरांचे तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण भारीत (अनिवार्य) (२२३० ए०६७)" या लेखाशिर्षांतर्गत "१३ कार्यालयीन खर्च" या उद्दिष्टाखाली सन २०१७-१८ या वर्षात पुरवणी मागणीन्वये मंजूर झालेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा. सदर रक्कम तातडीने मा. उच्च न्यायालयात भरणा करण्याची दक्षता जिल्हाधिकारी / उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) उदगिर जि. लातूर यांनी घ्यावी.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ.सं.क्रमांक १०/१८/व्यय-६, दिनांक ०९.०१.२०१८ अन्वये मिळालेल्या मान्यतेनुसार, निर्गमीत करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३०६१०४५४९४६०३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sakharam Dina Kharat

Digitally signed by Sakharam Dina Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SD And E Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c6d1f4d2e41b8e84bb98ddddcac30549 27f82f9c1a5810e2874cdac2c44c28c2, cn=Sakharam Dina Kharat
Date: 2018.03.06 15:34:13 +05'30'

(स. दि. खरात)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

२) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद. (संचालनालयामार्फत)
३) प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चाकूर, जि.लातूर (संचालनालयामार्फत)
४) विभागीय आयुक्त, लातूर विभाग, लातूर. (संचालनालयामार्फत)
५) जिल्हाधिकारी, लातूर. (संचालनालयामार्फत)
६) उप जिल्हाधिकारी व विशेष भूसंपादन अधिकारी, मध्यम प्रकल्प क्रमांक २, लातूर. (संचालनालयामार्फत)
७) जिल्हा कोषागार अधिकारी, लातूर. (संचालनालयामार्फत)
८) सरकारी वकील, मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद, खंडपीठ. (संचालनालयामार्फत)
९) जिल्हा सरकारी वकील, लातूर. (संचालनालयामार्फत)
१०) महालेखापाल -१/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
११) महालेखापाल -१/२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
१२) वित्त विभाग (अर्थसंकल्प शाखा -२/४/ व्यय-६), मंत्रालय, मुंबई.
१३) कक्ष अधिकारी (रोस्वरो -२), कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१४) निवडनस्ती (व्य.शि.-२), कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.